# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६३ वे अंक ५५) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. - ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार, दि.१६ फेब्रुवारी २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


## फारुख अब्दुल्ला जम्मू-काश्मीरमध्ये स्वबळावर निवडणूक लढविणार

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारचा पराभव करण्यासाठी काँग्रेसप्रणीत इंडिया आघाडीने २६ पक्षांची मोट बांधली होती. या आघाडीला इंडिया आघाडी असे नाव देण्यात आले. मात्र लोकसभा निवडणुकीची घोषणा होण्यापूर्वीच जागा वाटपाच्या मुद्द्यावरून इंडिया आघाडीतील मतभेद उघड होत आहेत. नितीश कुमार यांच्या जनता दल (युनायटेड) पक्षाने बिहारमध्ये थेट भाजपाबरोबर सरकार स्थापन करून आघाडीला पहिला धक्का दिला. त्यानंतर ममता बॅनर्जी आणि अरविंद केजरीवाल यांनी काँग्रेसशी जागावाटपावरून मतभेद असल्याचे उघड केले. त्यानंतर आता जम्मू आणि काश्मीरमधील नॅशनल कॉन्फरन्स या पक्षानेही स्वबळावर निवडणूक लढविणार असल्याची घोषणा केली आहे.

नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे प्रमुख फारूख अब्दुल्ला यांनी गुरुवारी पत्रकार परिषद घेऊन आगामी लोकसभा निवडणुकीत त्यांचा पक्ष स्वबळावर निवडणूक लढविणार असल्याचे सांगितले. तसेच लोकसभा निवडणुकीबरोबरच जम्मू आणि काश्मीरमध्ये विधानसभा निवडणुकांचीही घोषणा होण्याची शक्यता आहे, असेही ते म्हणाले. पत्रकार परिषदेत बोलतान अब्दुल्ला म्हणाले, 'जागावाटपाचा प्रश्नच येत नाही, नॅशनल कॉन्फरन्स पक्ष निःसंशय स्वबळावर निवडणूक लढविणार आहे.'

# राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादांचीच

## राहुल नार्वेकरांचा निकाल, पक्षाचे ४१ आमदार अपात्र नाहीत; शरद पवारांना धक्का



मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- विधीमंडळ सदस्यांची संख्या पाहता ४१ आमदारांचे पाठबळ अजित पवार गटाकडे दिसते. त्यामुळे अजित पवार यांना विधीमंडळ गटाचा पाठिंबा दिसून येतो. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार यांचाच आहे. अजित पवार यांच्यासोबत असणारे सर्व आमदार अपात्र होत नाहीत, असा निकाल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिला. महिनाभरात राहुल नार्वेकर यांनी हा मोठा निर्णय दिला. दरम्यान मागील काही दिवसांपूर्वी शिवसेनेत पडलेल्या दोन गटाचा निकालही विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी अशाच प्रकारे दिला होता. किंबहूना शिवसेनेच्या निकालाचीच पुनरावृत्ती आज झाल्याचे पाहायला मिळाले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आमदार अपात्र प्रकरणी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज पाच याचिकांवर निर्णय दिला. शरद पवार गटाकडून तीन तर अजित पवार गटाकडून दोन याचिका सादर करण्यात आल्या होत्या. सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या निकषांवरून पक्षाची राज्यघटना, पक्षाचं नेतृत्व आणि पक्षाचा विधिमंडळ गट यावरून यासंदर्भातला निर्णय घेतला गेला असल्याचे राहुल नार्वेकर यांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कुणाचा हे ठरवाताना राहुल नार्वेकर यांनी पक्षघटना, नेतृत्व रचना आणि विधिमंडळ बहुमताचा विचार केला. राष्ट्रवादी काँग्रेसची घटना सर्वात महत्त्वाची आहे. दोन्ही गट त्याला बांधिल आहेत. ३० जून २०२३ ला या पक्षात फूट पडली. अश्यावेळी नेतृत्त्वाबाबत पक्षाची घटना काय सांगते हे महत्त्वाचं आहे, असे नार्वेकर म्हणाले. आपला अध्यक्ष कसा योग्य हे सिद्ध करण्यासाठी दोन्ही बाजूंनी पुरावे दिले. दोन्ही गटांकडून समांतर दावे करण्यात आले. प्रतिनिधिंच्या निवडणुकीचे पुरावे शरद पवार गटाकडून सादर करण्यात आले नाहीत. पक्षाचा अध्यक्ष कोण हे मी ठरवू शकत नाही. अध्यक्षपदाची निवड घटनेला धरुन नाही, असा दावा दोन्ही गटाकडून करण्यात आला. २९ जून २०२३ पर्यंत शरद पवार यांच्या अध्यक्षपदाला आव्हान नव्हतं. पण ३० जून २०२३ रोजी दोन जणांकडून अध्यक्ष असल्याचा दावा करण्यात आला. पक्षाचा अध्यक्ष मी ठरवू शकत नाही. त्यामुळे विधिमंडळ बहुमतावर पक्ष कुणाचा हा निर्णय द्यावा लागेल.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कुणाचा हे ठरवताना विधिमंडळ बहुमाताचा विचार करावा लागला. ५३ पैकी ४१ आमदार अजित पवार यांच्याकडे आहे. हे बहुमत शरद पवार गटाकडे नाही. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा अजित पवार यांचाच आहे. त्यामुळे अजित पवार यांच्यासोबत असणारे सर्व आमदार पात्र ठरतील. शरद पवार गटाने दाखल केलेली याचिका विधानसभा अध्यक्षांनी फेटाळून लावली.

## इलेक्टोरल बाँड्स योजना घटनात्मक दृष्ट्या अवैध

### सर्वोच्च न्यायालयाचा मोदी सरकारला धक्का

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- निवडणुक रोख्यांची योजना ही घटनात्मकदृष्ट्या अवैध असल्याचा निकाल सुप्रीम कोर्टाने दिला आहे. सुप्रीम कोर्टाचा हा निर्वाळा पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारला मोठा धक्का असल्याचे म्हटले आहे. निवडणुकीतील काळा पैशांचा वापर रोखण्यासाठी इलेक्टोरल बाँड्स हा एकमेव मार्ग नसल्याचे सुप्रीम कोर्टाने म्हटले आहे.त्याशिवाय, आता निवडणूक रोखे तात्काळ प्रभावाने बंद करण्याचे निर्देशही सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या घटनापीठाने हा निकाल दिला आहे.

इलेक्टोरल बाँड्सच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या एकूण चार याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या होत्या. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या खंडपीठाने या प्रकरणी मागील वर्षी ऑक्टोबरमध्ये यावर सुनावणी केली होती आणि नोव्हेंबरमध्ये निर्णय राखून ठेवला होता.

गुरुवारी इलेक्टोरल बाँड योजनेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर निकाल देताना सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड म्हणाले, खंडपीठाचा निर्णय सर्वसंमतीने आहे. जरी, या प्रकरणात दोन निर्णय असले तरी परंतु निष्कर्ष एक असल्याचेही त्यांनी म्हटले. न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड, न्यायमूर्ती संजीव खन्ना, न्यायमूर्ती बीआर गवई, न्यायमूर्ती जेबी परडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने एकमताने हा निकाल दिला. सरन्यायाधीश म्हणाले, 'राजकीय पक्ष हे राजकीय प्रक्रियेतील महत्त्वाचे घटक आहेत. राजकीय निधीची माहिती ही अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे मतदाराला मतदान करण्यासाठी योग्य पर्याय मिळतो. मतदारांना निवडणूक निधीबद्दल जाणून घेण्याचा अधिकार आहे, त्याद्वारे मतदानाची योग्य निवड केली जाते.

इलेक्टोरल बाँड योजनेमुळे काळ्या पैशांचा वापर थांबेल, असा युक्तिवाद सरकारने केला होता. या योजनेमुळे नागरिकांच्या माहिती अधिकारावर परिणाम होत नाही असेही सांगण्यात आले. मात्र, ही योजना माहिती अधिकाराच्या कायद्याचे उल्लंघन असल्याचेही कोर्टाने म्हटले. पक्षाच्या देणगीदारांच्या नावांची गोपनीयता राखणे सरकारने आवश्यक मानले. पण हे आम्हाला मान्य नसल्याचेही सुप्रीम कोर्टाने म्हटले.

इलेक्टोरल बाँड योजना कलम १९ १(अ) अंतर्गत असलेल्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन करते. प्रत्येक देणगी सरकारी धोरणांवर प्रभाव टाकण्यासाठी असते असे नाही. राजकीय संलग्नतेमुळे लोक ही देणगी देतात. हे सार्वजनिक करणे योग्य होणार नाही. त्यामुळे छोट्या देणग्यांची माहिती सार्वजनिक करणे चुकीचे ठरेल. व्यक्तीचा राजकीय कल गोपनीयतेच्या अधिकारात येत असल्याचेही कोर्टाने म्हटले.

## राज्यसभेसाठी उमेदवारांचे नामांकन अर्ज दाखल!

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- राज्यसभेच्या उमेदवारीसाठी आज महायुतीच्या सर्व उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. काँग्रेसला 'जय महाराष्ट्र' करत नुकतेच भाजप पक्षात दाखल झालेले अशोक चव्हाण यांनी गुरुवारी राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. अशोक चव्हाण यांच्यासोबत भाजपच्या तीन उमेदवारांनी राज्यसभेच्या उमेदवारीसाठी अर्ज दाखल केले. मेधा कुलकर्णी आणि अजित गोपछडे यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज भाजपच्या तीन राज्यसभा उमेदवारांचे अर्ज दाखल करण्यासाठी विधीमंडळात दाखल झाले होते. भाजपचे प्रदेशाध्यक्ष महायुतीतील सर्व उमेदवारांनी आज राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. याबरोबरच महाविकास आघाडीतील काँग्रेस पक्षाकडून चंद्रकांत हंडोरे यांनीही आपला उमेदवारी अर्ज आज दाखल केला आहे. महाराष्ट्रात एकूण सहा जागांसाठी मतदान होणार असून या सहा उमेदवारांना प्रतिस्पर्धी उमेदवार नसल्याने ही निवडणूक बिनविरोध होणार यावर शिक्कामोर्तब झाला आहे.

## राहुल नार्वेकरांच्या निकालाला न्यायालयात आव्हान देणार-सुप्रिया सुळे

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- 'जे शिवसेनेचे झाले तेच आमच्याबाबत होत आहे. कॉपीपेस्ट निकाल आहे. यामध्ये काही क्रियेटीव्हिटीही नाही. जे उद्धवजींबरोबर होत आहे. ते पवार साहेबांबाबत एका महिन्यानंतर घडत आहे. तुम्ही नार्वेकरांकडून काय अपेक्षा करणार? सगळ नियम कायदे, संविधान सोडूनच काम सुरु आहे, अशी प्रतिक्रिया शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली आहे. नार्वेकरांच्या निकालावर आम्ही सर्वोच्च न्यायालयात जाणार असेही सुळे यांनी स्पष्ट केले आहे. अदृश्य शक्तीसाठी नार्वेकर ड्राफ्टिंग करतात. ते फक्त कॉपी करतात. हे फार दुर्दैवी आहे. सुब्रमण्यम यांनी एक पत्र लिहिले आहे. भारतीय जनता पक्ष कसा चालतो, याबाबत त्यांनी त्या पत्रात भाष्य केले आहे, असेही सुळे यांनी यावेळी सांगितले.

यावर शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी प्रतिक्रिया दिली. त्यांनी राहुल नार्वेकर यांनी दिलेला निकाल म्हणजे 'कायद्याची पायमल्ली' अशा शब्दात त्यांनी संताप व्यक्त केला. तर शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले की, आम्हाला हा निकाल मान्य नाही, कायद्याचे उल्लंघन करत हा निकाल दिलेला आहे, त्यामुळे आम्ही सुप्रीम कोर्टात दाद मागू, आम्हाला त्या ठिकाणी न्याय मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

जितेंद्र आव्हाड पुढे बोलताना म्हणाले की, कायद्याची पायमल्ली कशी करावी, आपल्या सोईचा निकाल कसा द्यावा याचे ट्युशन नार्वेकर देऊ शकतात. त्यांना आता देशाच्या कायद्याचे प्रमुख केले पाहिजे, देशाचा कायदाच बदलण्याचा अधिकार दिला पाहिजे, असा खोचक टोला देखील लगावला.

ज्याप्रमाणे धृतराष्ट्र डोळ्याला पट्टी बांधून सर्व काही वाचत होता. त्याचप्रमाणे अगदी नार्वेकरांनी डोळ्याला पट्टी लावून निकालाचे वाचन केले आहे. आम्हाला पात्र करून त्यांनी आम्हाला दिलासा दिला असे म्हणता येणार नाही. पण राज्यात जे गैर चालू आहे. ते अत्यंत वाईट आहे. हा निकालाच हास्यास्पद आहे. शेड्युलड १० ची त्यांनी थट्टा केली आहे, असा घणाघात देखील जितेंद्र आव्हाड यांनी केला.

## तर मग पुन्हा उपोषण कशाला?; छगन भुजबळांचे मनोज जरांगेंना सवाल

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- २७ जानेवारीला गुलाल उधळला. रात्री डिजे लावला मग आता उपोषण का करताय? असा सवाल मंत्री छगन भुजबळ यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांना केला आहे. मनोज जरांगे मुंबईत दाखल झाल्यानंतर सरकारकडून अधिसूचना काढण्यात आली होती. त्यानंतर मराठा समाज आणि मनोज जरांगे यांनी जल्लोष केला होता. मात्र, गेल्या काही दिवसांपासून जरांगे पुन्हा एकदा उपोषणाला बसले आहेत. यावर छगन भुजबळ यांनी सवाल उपस्थित केले आहेत.

छगन भुजबळ म्हणाले, एनकेन प्रकारे ओबीसीमध्ये घुसतात सर्व मार्गांनी आरक्षण हवे. ओबीसींचे आरक्षण वाचवणे हे माझं लक्ष आहे. सध्या ओबीसी नोंदींचे फॉर्म गोळा करण्यासाठी गर्दी होत आहे. मनोज जरांगेंना श्रेय घ्यायचय. आरक्षण टिकावे याला आमचा पाठिंबा आहे. श्रेय मिळावं म्हणून उपोषण १५ तारखेची वाट बघावी लागणार आहे. जरांगेंनी आम्हाला आईवरुन शिव्या दिल्यात. मात्र, एका अधिवेशनात सर्व विषय मार्गी लागतील.

## आग लगी है, कब बुझेगी, २०२४ के बाद मालूम पड़ेगा -अनिल पाटील

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलेल्या निकालाचे मी स्वागत करतो, नार्वेकर यांनी कायद्याला धरून निकाल दिला आहे. घटनेचा आणि कायद्याचा तंतोतंत अभ्यास करून तसेच त्यांना असलेली मर्यादा, हे सर्व डोळ्यासमोर ठेवून त्यांनी निकाल दिला आहे. आणि या निकालावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून आम्ही समाधानी असल्याची प्रतिक्रिया अजित पवार गटाचे प्रतोद आमदार अनिल पाटील यांनी दिला आहे. 'आग लग गई है, आग कब बुझेगी, यह २०२४ के बाद मालूम पड़ेगा' असा दावा देखील अनिल पाटील यांनी केला आहे.

अजित पवार गटाच्या वतीने दाखल केलेल्या याचिकेसंदर्भात सध्या सांगता येणार नाही. वास्तविक निकालाची प्रत अद्याप हातात आलेली नाही. ती प्रत पाहिल्यानंतरच या संदर्भात आपण बोलू शकतो असे देखील आमदार अनिल पाटील यांनी म्हटले आहे. आता अध्यक्षांनी जो निर्णय घेतला आहे, त्यात आम्ही दाखल केलेला याचिकेचा विचार करायला हवा होता. मात्र, प्रत्यक्ष निकालात काय म्हटले आहे? हे येणाऱ्या दोन-तीन दिवसात कळल्यानंतरच त्याविषयी प्रतिक्रिया देता येईल, असे देखील अनिल पाटील यांनी म्हटलं आहे.

## पुढील २ दिवस अवकाळीचे सावट; मराठवाड्यातही हलक्या पावसाचा अंदाज

पुणे दि.१५ (प्रतिनिधी)- काही दिवसांपूर्वी राज्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यांनतर पावसाने उघडीप दिली आणि राज्यातील तापमानात वाढ झाली. अनेक ठिकाणी पारा ३०च्या पुढे गेला आहे. त्यामुळे राज्यात उन्हाचा चटका आणि उकाडा कायम आहे. मात्र आता पुढील दोन दिवस राज्यात पुन्हा एकदा पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. त्यामुळे राज्यावर अवकाळी पावसाचे सावट कायम आहे.

पुणे हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार राज्यातील विदर्भ आणि मराठवाड्याच्या काही भागांत पुढील दोन दिवस हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि नागपूर या विदर्भातील जिल्ह्यांना हवामान विभागाने हलक्या पावसाचा यलो अलर्ट दिला. वाऱ्याची चक्रिय स्थिती दक्षिण गुजरात, मराठवाडा आणि विदर्भावर असल्याने या भागात पावसाची शक्यता असल्याचे हवामान खात्याने म्हटले आहे.

## हायकोर्टाकडून मनोज जरांगेंना उपचार घेण्याचा आदेश

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- मराठा समाजातील कुणबी नोंदी असणाऱ्या लोकांना आणि त्यांच्या सगेसोयऱ्यांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्यासाठीच्या अधिसूचनेची तातडीने अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी पुन्हा एकदा उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती सध्या प्रचंड खालावली आहे. त्यांनी अंतरवाली सराटी येथे १० फेब्रुवारीपासून आमरण उपोषणाला सुरुवात केली होती. आज त्यांच्या उपोषणाचा सहावा दिवस असून त्यांची प्रकृती प्रचंड खालावली आहे. मनोज जरांगे यांच्या उपोषण आंदोलनाविरोधात डॉ. गुणरत्न सदावर्ते यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर गुरुवारी सुनावणी झाली. त्यावेळी गुणरत्न सदावर्ते यांनी कोर्टात मनोज जरांगे यांची बाजू मांडणाऱ्या वकिलांची कोंडी करण्याचा प्रयत्न केला.

मनोज जरांगे हे त्यांची प्रकृती कमालीची ढासळली असूनही उपचार घ्यायला तयार नाहीत. हा मुद्दा आजच्या सुनावणीवेळी मांडण्यात आला. यावेळी राज्य सरकारच्या वतीने महाधिवक्त्यांनी बाजू मांडली. मनोज जरांगे प्रशासनाला वैद्यकीय देखरेख करू देत नाहीत. ते रक्ताची तपासणी करण्यास नकार देत आहेत, असे त्यांनी सांगितले. त्यावर जरांगे यांच्या वकिलांनी १४ फेब्रुवारीला मनोज जरांगे यांच्यावर प्राथमिक उपचार झाल्याचे सांगितले. त्यावर उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने काही प्रश्न उपस्थित केले. जर राज्य सरकार तुमची काळजी घेतंय तर, उपचार स्वीकारण्यात तुम्हाला काय अडचण आहे? भारताचे नागरीक या नात्यानं आंदोलन करणं हा तुमचा अधिकार, पण त्यामुळे कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होणार नाही, ही देखील तुमची जबाबदारी आहे. कुठल्याही आंदोलनामुळे जनतेला त्रास होता कामा नये. मनोज जरांगे उपचार घेणार की नाही, हे पुढील १० मिनिटांत आम्हाला सांगा, असे खंडपीठान जरांगे यांच्या वकिलांना सांगितले

## ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता आम्ही मराठा आरक्षण देणार-देवेंद्र फडणवीस



मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- ओबीसी आरक्षणला कुठेही धक्का न लावता आम्ही मराठा समाजाला आरक्षण देणार आहोत. मनोज जरांगे यांना आरक्षण पटेल की नाही माहित नाही, पण मराठा समजाला आरक्षण पटेल, मान्य होईल, असं वक्तव्य उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. ते लोकमतच्या कार्यक्रमात बोलत होते. यावेळी त्यांनी सर्व विषयावर आपलं मत व्यक्त केले. उद्धव ठाकरेंवर टीका केली. त्याशिवाय अजित पवार यांच्यासोबतच्या पहाटेच्या शपथविधीवरही त्यांनी भाष्य केले. तसेच भविष्यात अनेक नेते भाजपमध्ये येतील, असा सूचक इशाराही त्यांनी यावेळी दिला.

सध्या मराठा आंदोलन सुरु आहे, त्याला काउंटर ओबीसी आंदोलन सुरु आहे. याला पॉलिटिकल अँगलने मी पाहत नाही. प्रत्येकाला जातीतून पाहायचं आहे, हे महाराष्ट्रासाठी दुर्दैवी आहे. आम्ही आंदोलनाला सकारात्मक पाहत आहोत. आम्ही मराठा समजला आरक्षण देणार आहोत, ओबीसी आरक्षणाला कुठेही धक्का लागणार नाही. आरक्षण देणं हे राज्याच्या हातात आहे, केंद्र सकाराने सुद्धा सांगितलं आहे की राज्य आरक्षण देऊ शकतो. मनोज जरांगे यांना आरक्षण पटेल की नाही माहित नाही पण मराठा समजाला आरक्षण पटेल मान्य होईल. आरक्षण मिळावं यासाठी डेटा आम्ही गोळा करत आहोत, सर्वोच्च न्यायालयाने आधी जो निर्णय दिला त्यानंतर आम्ही यावर काम करतोय, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

पंतप्रधान मोदीच नाही खर्गे सुद्धा म्हणतात २०२४ ची निवडणूक ही पॉलिटिकल केमिस्ट्रीची निवडणूक आहे.यामध्ये १+१ हे ११ होतात. ही केमिस्ट्री तयार झाली आहे. हे मोदीजींना माहिती आहे. लोकांना वाटतंय की आपला विचार करणारा पंतप्रधान आहे. त्यामुळे हा रिझल्ट येणार आहे. राज्यातून ४८ पैकी ४२ वर होतो त्यापेक्षा कमी जागा येऊ देणार नाही, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

ज्यांच्या स्टँडिंग जागा असतील त्या जागा तशाच त्या पक्षांकडे महायुतीमध्ये राहतील. त्यापेक्षा कमी जागा कशा देणार.फक्त एक दोन जागी उमेदवार इकडे तिकडे जातील, असेही फडणवीस म्हणाले.

गुजरात एक सक्षम राज्य आहे, मोठा भाऊ हा मोठा भाऊ राहणार महाराष्ट्र हा मोठा भाऊ आहे. लहान भावाचा विकास होत असेल तर वाईट वाटायचं कारण नाही मोठा भाऊ हा मोठाचं राहील आणि लहान भावाच्या पुढे जाईल, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

उद्धव ठाकरे यांनी आता सोबत येण्याची दारं बंद केली आहेत, आमची मन दुखावली आहेत. ज्या प्रकारे पंतप्रधान मोदींवर बोलतात, खालच्या पातळीवर बोलतात. मनं दुखावली आहेत. जिथे मन दुखावतात तिथे युती होणे शक्य नाही. पॉलिटिकली डीफरन्स असतील तर युती होऊ शकते पण येथे आमची मने दुखावली आहेत. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्यासोबत कोणत्या स्थितीमध्ये युती होणार नाही, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## काँग्रेसच्या बैठकीला ७ आमदारांची दांडी

### प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी ३ जणांच्या गैरहजेरीचे कारण केले स्पष्ट

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या भाजप प्रवेशानंतर काँग्रेस विधीमंडळ पक्षाच्या आज झालेल्या बैठकीत ७ आमदारांनी दांडी मारली. यात चव्हाण यांचे समर्थक असणाऱ्या नांदेडच्या ३ आमदारांचा समावेश आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी काही अनुपस्थित आमदारांनी आपल्या गैरहजेरीचे कारण आपल्या कानावर घातल्याचा दावा केला आहे.

काँग्रेसने राज्यसभेसाठी माजी मंत्री चंद्रकांत हंडोरे यांना उमेदवारी दिली आहे. त्यांचा उमेदवारी अर्ज गुरुवारी दाखल करण्यात आला. तत्पूर्वी, पक्षाने आपल्या आमदारांची विधीमंडळात एक बैठक बोलावली होती. या बैठकीला ३६ आमदार हजर राहिले. तर ७ आमदार गैरहजर राहिले. यात नांदेड जिल्ह्यातील आमदार मोहन हंबर्डे, जितेश अंतापूरकर व माधवराव जवळगावकर या ३ आमदारांचा समावेश आहे. या तिघांनीही आपल्याला आपल्या अनुपस्थितीचे कारण कळवल्याचे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले आहे. आमच्या एका सहकाऱ्याच्या मुलाचे लग्न आहे, तर २ सहकाऱ्यांनी आम्हाला काही कारणास्तव येणे झाले नसल्याचे कळवले आहे, असे पटोले यांनी यावेळी सांगितले.

जितेश अंतापूरकर, माधवराव जवळगावकर, अस्लम शेख, झिशान सिद्दिकी, मोहन हंबर्डे, अमित देशमुख आदी आमदार बैठकीला गैरहजर होते. आणखी एक आमदार वाटेत असल्याचा निरोप आला. काही आमदारांनी बैठकीला न येण्याचे कारण कळवले. पण तीन आमदारांनी काहीच कळवले नसल्याचे सांगितले जात आहे. हे तिन्ही आमदार अशोक चव्हाण यांचे समर्थक असल्याचेही सांगितले जात आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. अशोक चव्हाण यांच्यासोबत काँग्रेसचे तीन आमदार आहेत काय? असा सवाल या निमित्ताने केला जात आहे. दरम्यान आमदार जितेश अंतापूरकर बैठकीनंतर आल्याचे समजते.

# आज रथसप्तमी

माघ शुद्ध सप्तमी म्हणजेच रथसप्तमी. या वर्षी तारखेनुसार रथसप्तमी १६ फेब्रुवारीला आहे. हा सूर्यनारायणाची मनोभावे पूजा करण्याचा अन् त्याच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस आहे. प्रतिवर्षी मकरसंक्रांतीला चालू होणाऱ्या हळदी-कुंकू समारंभांची सांगता रथसप्तमीच्या दिवशी केली जाते. या दिनाचे माहात्म्य अन् साजरा करण्याची पद्धत या लेखातून जाणून घेऊया.

**इतिहास :** सोन्याच्या हिरेजडीत रथात सूर्यदेव बसलेला दिवस म्हणजेच 'रथसप्तमी' : सूर्यदेवाला साधना करतांना स्थिर उभे रहायला लागल्याने उभे राहून त्याला त्याची गति सांभाळता येईना. त्याचे पाय दुखू लागले आणि त्यामुळे त्याची साधना नीट होईना. तेव्हा त्याने परमेश्वराजवळ त्याविषयी तक्रार केली अन् बसण्याची व्यवस्था करण्यासाठी सांगितले. 'मी बसल्यानंतर माझी गति कोण सांभाळणार', अशी त्याने परमेश्वराजवळ विचारणा केली. तेव्हा परमेश्वराने सूर्यदेवाला बसण्यासाठी सात अश्व (घोडे) असलेला सोन्याचा हिरेजडीत रथ तयार करून दिला. ज्या दिवशी सूर्यदेव त्या रथात बसला, तो दिवस म्हणजे 'रथसप्तमी'. याचा अर्थ 'सात घोड्यांच्या रथ'.

**'रथसप्तमी' हा सूर्यदेवाचा जन्मदिन !** - 'माघ शुक्ल पक्ष सप्तमीला 'रथसप्तमी' असे म्हणतात. महर्षि कश्यप आणि देवमाता अदिती यांच्या पोटी सूर्यदेवाचा जन्म झाला, तो हा दिवस ! भगवान श्रीविष्णूचे एक रूप म्हणजेच श्री सूर्यनारायण होत. संपूर्ण विश्वाला आपल्या महातेजस्वी स्वरूपाने प्रकाशमय करणाऱ्या सूर्यदेवांमुळे पृथ्वीवर जीवन अस्तित्वात आहे.

सूर्याचे उत्तरायणात मार्गक्रमण होत असल्याचे सूचक असलेला रथसप्तमीचा सण ! - रथसप्तमी हा सण सूर्य उत्तरायणात मार्गक्रमण करत असल्याचे सूचक आहे. उत्तरायण म्हणजे उत्तर दिशेकडून मार्गक्रमण करणे. उत्तरायणात सूर्य उत्तर दिशेकडे कललेला असतो. 'श्री सूर्यनारायण आपला रथ उत्तर गोलार्धात वळवत आहेत', अशा स्थितीत रथसप्तमी दर्शवली जाते. रथसप्तमी हा सण शेतकऱ्यांसाठी सुगीचे दिवस आल्याचा आणि दक्षिण भारतात हळूहळू वाढणाऱ्या तापमानाचा दर्शक असतो, तसेच वसंत ऋतू जवळ आल्याचा सूचक असतो.

**जीवनाचा मूळ स्त्रोत असलेला सूर्य!** - सूर्य हा जीवनाचा मूळ स्त्रोत आहे. सूर्यकिरणांतून शरिराला आवश्यक असलेले 'ड' जीवनसत्त्व मिळते. काळाचे मोजमाप सूर्यावरच अवलंबून आहे. सूर्य हा ग्रहांचा राजा असून त्याचे स्थान नवग्रहांमध्ये आहे. तो स्थिर असून अन्य सर्व ग्रह त्याच्याभोवती प्रदक्षिणा घालतात. सूर्य स्वयंप्रकाशी असून अन्य ग्रह त्याचा प्रकाश घेतात.

**हिंदु धर्मातील सूर्योपासनेचे महत्त्व** - सूर्योपासनेला हिंदु धर्मात पुष्कळ महत्त्व आहे. सूर्याला प्रतिदिन पहाटे अर्घ्य दिल्याने अंधःकार नष्ट करून जग प्रकाशमय करण्यासाठीचे बळ सूर्याला प्राप्त होते. (उपासनेमुळे मूर्ती जागृत होते, तसे हे आहे.)

**ज्योतिषशास्त्रदृष्ट्या रवीचे (म्हणजे सूर्याचे) महत्व** - ज्योतिषशास्त्रदृष्ट्या रवि (म्हणजे सूर्य) हा आत्माकारक आहे. 'मानवी शरिरातील प्राण, आत्मिक बळ आणि चैतन्यशक्ती यांचा बोध रवीवरून होतो', असा त्याचा अर्थ आहे. व्यक्तीच्या जन्मकुंडलीतील रवि जितका बलवान, तितकी त्या व्यक्तीची जीवनशक्ती आणि रोग प्रतिकारक शक्ती उत्तम असते. राजा, प्रमुख, सत्ता, अधिकार, कठोरता, तत्त्वनिष्ठता, कर्तृत्व, सन्मान, कीर्ती, आरोग्य, वैद्यकशास्त्र इत्यादींचा कारक रवि आहे. सूर्यदेवांच्या रथाला असणारे सप्त अश?व सप्ताहातील सात वार दर्शवतात. रथाला असणारी बारा चाके बारा राशी दर्शवतात.

**रथसप्तमीला करावयाचा सूर्यदेवाचा पूजाविधी** - रथसप्तमीला व्यक्तीने अरुणोदयकाली स्नान करावे. सूर्यादेवाची १२ नावे घेऊन न्यूनतम १२ सूर्यनमस्कार घालावेत. पाटावर रथात बसलेल्या सूर्यनारायणाची आकृती काढून त्याची पूजा करावी. त्याला तांबडी फुले वाहावीत.

सूर्याला प्रार्थना करून आदित्यहृदयस्तोत्रम्, सूर्याष्टकम् आणि सूर्यकवचम्, यांपैकी एखादे स्तोत्र भक्तीभावाने म्हणावे किंवा ऐकावे. रथसप्तमीच्या दिवशी कुठलेही व्यसन करू नये. रथसप्तमीच्या दुसऱ्या दिवसापासून प्रतिदिन सूर्याला प्रार्थना करावी आणि सूर्यनमस्कार घालावेत. त्यामुळे उत्तम आरोग्य प्राप्त होते.'

**रथसप्तमी साजरा करण्याची पद्धत**

**सूर्यनारायणाची पूजा :** रांगोळीने किंवा चंदनाने पाटावर सात घोड्यांचा सूर्यनारायणाचा रथ, अरुण सारथी आणि रथात सूर्यनारायण काढतात. सूर्यनारायणाची पूजा करतात. अंगणात गोवऱ्या पेटवून त्यांवर एका बोळक्यात दूध उतू जाईपर्यंत तापवतात; म्हणजे अग्नीला समर्पण होईपर्यंत ठेवतात. त्यानंतर उर्वरित दुधाचा सर्वांना प्रसाद देतात.

**मकरसंक्रांत ते रथसप्तमी या काळातील कौटुंबिक विधी :** 'सुनेचे तीळवण, जावयाचे प्रथम वाण आणि बाळाचे बोरवण करतात. या वेळी सुनेला, जावयाला आणि बाळाला हलव्याचे दागिने करतात.'

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'**

**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था**

# भारतीय राजकारणातील रामलहर

**दिनांक** १० फेब्रुवारी २०२४ रोजी १७ व्या लोकसभेचे सूप वाजले.या अखेरच्या दिवशी संसदेत अयोध्येत पूर्णत्वास गेलेल्या रामलल्लाच्या मंदिराबाबत आनंद व्यक्त करणारा एक ठराव मंजूर केला गेला.या ठरावाच्या निमित्ताने संसदेत झालेली चर्चा अत्यंत श्रवणीय होती. रोज एकमेकांचे गळे घोटू पाहणारे राजकारणी पूर्णपणे राममय झाले होते. आपापसातील द्वेषभावना, स्पर्धा, मतभेद, मनभेद, पक्षभेद इथे गळून पडले होते. अनेक सदस्यांच्या प्रतिभेला/भावनांना धुमारे फुटले होते. जातीभेदांना तर थाराच नव्हता. 'रामभक्त' ही एकच जात अवघ्या सदनाला व्यापून राहिलेली दिसली. अनेक सदस्यांनी वाल्मिकी रामायण, तुलसी रामायण यातील श्लोक, तिहाई, कबीराचे दोहे तोंडपाठ नुसते म्हणून नाही तर गाऊन दाखवले. रामनामाची महती सांगताना अनेक सदस्यांचे गळे दाटून आले होते. आनंदाश्रूंच्या धारा त्यांच्या नेत्रांतून ओघळत होत्या आणि भावनांच्या कल्लोळामुळे कित्येकांच्या तोंडून शब्द फुटत नव्हते. 'रामनामाच्या' कॉरिडॉरने पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर भारत जोडला गेल्याचे अभूतपूर्व दृश्य संसदेत बघायला मिळाले. हा खरोखरी एक सोहळा होता आणि या सोहळ्याला दृष्ट लागू नये याची काळजी तृणमूल कॉंग्रेस, वामपंथी आणि समाजवादी पक्षांनी 'बहिष्कार' टाकून घेतली होती. पण सगळ्यात आश्चर्य म्हणजे ओवेसीनी ठरावावरील चर्चेत भाग घेतला आणि रामाची महती आपल्या कृतीने सिद्ध केली.

या सर्व घटनांतून काय संदेश मिळाला तर देशात एक सुप्त रामलहर निर्माण झाली आहे आणि या लहरीत समाज तोडण्याचे, फूट पाडण्याचे सर्व प्रयत्न वाहून जाणार आहेत. आंध्र प्रदेशातील वाय एस आर कॉंग्रेसच्या खासदारांनी कबुली दिली की दक्षिण भारतातील लोक सुद्धा आता 'जय श्रीराम' असा उदघोष करू लागले आहेत आणि अयोध्येतील राम मंदिराला मोठ्या संख्येने भेट देऊ लागले आहेत. या रामलहरींची जाणीव राजकारण्यांना झाली नाही तर नवल ते काय? श्वानांची घ्राणेंद्रिये जशी तीक्ष्ण असतात तशीच राजकारण्यांची वाऱ्याची दिशा ओळखण्याची क्षमता अभूतपूर्व असते. याचे प्रत्यंतर आता येऊ लागले आहे.

सर्व पक्षांची भाजपच्या जवळ जाण्याची, त्यांच्या आघाडीत (एन.डी.ए) जाण्याची चढाओढ सुरु झाली आहे. तेलगू देसमचे चंद्राबाबू नायडू अमित शहांना भेटल्याच्या दुसऱ्याच दिवशी त्यांचे आंध्र प्रदेशातील प्रतिस्पर्धी विद्यमान मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी तातडीने दिल्लीला धावले व त्यांनी मोदींची भेट घेतली. नितीश कुमारांनी तर आधीच पलटी मारली आहे. अकाली दल पुन्हा एकदा भाजपबरोबर हातमिळवणी करण्यास आतुर झाला आहे. चरणसिंगांना 'भारत रत्न' दिल्याच्या निमित्ताने पंतप्रधानांचे अभिनंदन करताना जयंत चौधरींनी ज्देग्रन सिग्नल्स दिलेच आहेत. तेलंगणातील चंद्रशेखर रावांचा पक्ष कुंपणावर बसून पलीकडे उडी मारण्यासाठी योग्य वेळेची प्रतीक्षा करत आहे.संसदेत त्यांच्या एका खासदाराने मोदींचा 'यशस्वी पंतप्रधान' म्हणून उल्लेख करताना याची हिंट दिलेली आहे. मायावती पण मागे नाहीत. त्यांच्या खासदाराने मोदींचे अभिनंदन तर केलेच पण कॉंग्रेसला इशारा दिला की राममंदिर हा राष्ट्रीय गौरवाचा विषय आहे आणि तुम्ही त्याला विरोध केला तर पालापाचोळ्यासारखे उडून जाल. अण्णा द्रमुक भाजपमध्ये कधी विलीन होईल याचा पत्ता सुद्धा कोणाला लागणार नाही. ओरिसात बिजू जनता दल तर आधीच भाजपच्या थाळीत जेवत आहे. देवेगौडांच्या जनता दल (एस) मधील 'सेक्युलर' शब्द गळून पडला आहे. राज्यसभेत बोलताना त्यांनी रामप्रतिष्ठापनेचा सोहळा बघणे हा आपल्या जीवनातील एक अलौकिक क्षण असल्याचे मान्य केले. त्यांनी मोदींनी केलेल्या कठोर अनुष्ठानाचे कौतुक केले.

मित्रहो, सध्या जाहीर होणारे सर्व निवडणूक अंदाज चुलीत घाला, त्याकडे अजिबात लक्ष देऊ नका. हे सर्व सर्व्हे लालूप्रसादांच्या नजरेतून 'जाती आधारित गृहीतकातून' केले जातात.पण शितावरून भाताची परीक्षा करायची असेल तर खालील दाखले बघा

१-ममता बॅनर्जींनी राहुलला आव्हान दिले आहे की हिंमत असेल तर वाराणसीतून निवडणूक लढवून दाखवा (वास्तविक हे आव्हान भाजपने द्यायला हवे )

२-संसदेत निरोपाचे भाषण करायला सर्वप्रथम सुप्रिया सुळे उठल्या. कदाचित त्यांना जाणीव झालेली असावी की आपल्याबाबरोबरच आपल्या राजकारणाचीही बिदाई होणार आहे.

३-सोनिया गांधी रायबरेलीतून निवडणूक न लढवता दक्षिण भारतातून निवडणूक लढवण्याची शक्यता आहे.

४-मोदींनी आपल्या तिसऱ्या टर्मच्या अग्रक्रमांची घोषणाही करून टाकली आहे.

एकूणच या सुप्त रामलहरींची जाणीव होण्यासाठी निकालापर्यंत वाट पाहण्याची गरज नाही. निकालाच्या दिवशी सर्व टीव्ही चॅनेल्स याच रामलहरींचा जयघोष करत असल्याचे तुम्ही ऐकाल. हीच तर आहे 'रामलल्लाची ' किमया.

**- रघुनंदन भागवत**

# अमृत महोत्सवानिमित्त प.पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सन्मान !

**वेदपरंपरेचे** रक्षणकर्ते, विश्वभर गीतेचा प्रसार करणारे आणि श्रीरामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. एकनाथजी शिंदे यांच्या शुभ हस्ते प.पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांचा सन्मान करण्यात आला. 'स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक' आणि 'हिंदु जनजागृती समिती' यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक', शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथे 'अमृत-महोत्सव सन्मान सोहळ्या'चे आयोजन करण्यात होते. या वेळी प.पू. स्वामीजींच्या ओघवत्या वाणीतील मार्गदर्शनाने उपस्थित राष्ट्र आणि धर्माभिमानी एक ऊर्जा आणि प्रेरणा घेऊन बाहेर पडले !



या वेळी व्यासपिठावर प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे शालेय शिक्षणमंत्री तथा मुंबई शहराचे पालकमंत्री श्री. दीपक केसरकर, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, शिवसेनेचे आमदार श्री. भरतशेठ गोगावले, स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे कार्याध्यक्ष श्री. रणजित सावरकर, हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ता श्री. रमेश शिंदे आणि सुदर्शन न्यूजचे मुख्य संपादक श्री. सुरेश चव्हाणके हे मान्यवर उपस्थित होते. सुदर्शन न्यूजचे मुख्य संपादक श्री. सुरेश चव्हाणके यांनी प.पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांनी यांची प्रकट मुलाखत या वेळी घेतली. स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे कार्याध्यक्ष श्री. रणजित सावरकर लिखित 'मेक शुअर गांधी इज डेड' या पुस्तकाचे प्रकाशन या वेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

**प.पू. स्वामीजींचे तपस्वी जीवन रखरखत्या उन्हात वटवृक्षाप्रमाणे सावली देणारे !**

एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री

प.पू. स्वामीजींसारख्या तपस्वींनी धर्मासाठी केलेले कार्य हे रखरखत्या उन्हात वटवृक्षाप्रमाणे सावली देणारे आहे. या स्पर्धेच्या युगात संतांच्या मार्गदर्शनाचा सर्वांना आधार वाटतो. संतांच्या मार्गदर्शनामुळे आम्ही जनतेची सेवा करू शकतो. स्वामीजींचे अखंडित कार्य आणि मार्गदर्शन यांमुळे समाजाला लाभ होत आहे. प.पू. स?वामी गोविंददेव गिरि महाराज यांनी ७५ वर्षे अखंड यज्ञकुंड पेटवला आहे. स्वत:साठी सर्व जगतात; परंतु स्वामीजींसारखी व्यक्तीमत्त्वे देशासाठी कार्य करतात, हे आपले भाग्य आहे. आपली प्राचीन संस्कृती, मंदिरे आणि छत्रपती शिवाजी महाराज यांनी निर्माण केलेले गड-दुर्ग यांचे रक्षण करण्यासाठी मी स्वतः प्रयत्नशील आहे, असे भावोद्गार महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी यांनी या वेळी काढले.

**छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांची विचारधारा देशाला तारणारी - प.पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज**

माझ्या विचारांची गंगा स्वातंत्र्यवीर सावरकर आणि स्वामी विवेकानंद या दोन तटांमधून वहात गेली म्हणून ती श्रीराम मंदिरापर्यंत पोचू शकली. छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांची विचारधारा देशाला तारणारी आहे. अनेक पिढ्यांनंतर श्रीराम मंदिर उभे राहिले. आता मात्र याच पिढीत आपले राष्ट्र उभे रहात असतांना आपण अनुभवूया. मी जगाच्या सर्व वाङ्मयाचा मागोवा घेतला; पण जगाच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्यासारखी रत्ने नाहीत. महाराष्ट्र जर यांचा आदर्श घेऊन चालेल, तर महाराष्ट्र पुन्हा एकदा जगाचे नेतृत्व करेल, असे उद्गार प.पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांनी काढले.

**स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांचे अध्यात्म समष्टीसाठी !**

**- रणजित सावरकर, कार्याध्यक्ष, स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक**

अध्यात्माचे प्रमुख ध्येय हे मोक्ष असते; पण स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांचे अध्यात्म हे समष्टीसाठी आहे. स्वामीजी तुम्ही संन्यास घेतला तरी राष्ट्र कार्यही केले आहे. राष्ट्रासाठी तुम्ही सर्वात मोठे केलेले कार्य म्हणजे श्रीराम मंदिर; कारण राम आमच्या राष्ट्राचा प्राण आहे. वीर सावरकर म्हणाले होते, जेव्हा आपण रामाला विसरू, तेव्हा आपल्या देशाचा प्राण जाईल. रामजन्मभूमीची घोषणा झाली तेव्हा स्वामीजी तुमच्यावर कोषाध्यक्षाची जबाबदारी आली. ही जबाबदारी आपण अत्यंत पारदर्शक पद्धतीने आणि अत्यंत समयबद्ध पद्धतीने करत तुम्ही हे राम मंदिर उभे केले आहे, असे प्रतिपादन स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे कार्याध्यक्ष श्री. रणजित सावरकर यांनी केले.

या वेळी हिंदु जनजागृती समितीचे राष?ट्रीय प्रवक?ते श्री. रमेश शिंदे म्हणाले की, 'प.पू. स?वामी गोविंददेव गिरि महाराज हे राष्ट्रयोगी संत आहेत. धर्म आणि अध्यात्म यांसह राष्ट्रविषयक महत्त्वाचे विचारधन स्वामीजी देत आहेत. भारतातील सर्व हिंदुत्वनिष्ठांसाठी ते पितृतुल्य स्थानी आहेत. आदर्श राज्याच्या म्हणजे रामललासाठी स्वामीजीच्या माध्यमातून कोषाध्यक्षही 'आदर्श' मिळाले आहेत. स्वामीजींच्या जीवनाचा आदर्श घेऊन धर्म आणि मंदिर रक्षणासाठी हिंदु राष्ट्राच्या कार्यासाठी हिंदूंनी पुढे यावे.' 'कोरोनाच्या काळात गीतेवर, अध्यात्मावर शेकडो प्रवचने ऑनलाईन घेऊन स्वामीजींनी १०० हून अधिक देशांतील लोकांना धीर दिला. आशीर्वाद दिला. हे त्यांचे कार्य अत्यंत उल्लेखनीय आहे. सर्व धार्मिक विचार समजून घेऊन त्यातून अनुभूती देण्याचे आपण कार्य स्वामीजी करत आहेत', असे गौरवोद्गार विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी काढले. शिवसेनेचे खासदार श्री. राहुल शेवाळे, भाजपचे मुंबई प्रदेश अध्यक्ष आमदार श्री. आशिष शेलार, भाजपचे प्रवक्ते तथा आमदार श्री. अतुल भातखळकर यांनीही आपले विचार व्यक्त करून प.पू. स्वामी गोविंददेव गिरि महाराज यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

राष्ट्रगीत आणि 'जय जय महाराष्ट्र माझा...' हे राज्यगीत यांनी कार्यक्रमाला प्रारंभ झाला. त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाच्या संगीत विभागाच्या विद्यार्थ्यांनी 'सकल जगामध्ये छान, आमचे प्रियकर हिंदुस्तान...' हे गीत सादर केले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन झाले, तसेच संतांचा सन्मान आणि मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी अग्नी फाउंडेशनचे संकेतस्थळ, लोगो आणि ॲपचे अनावरण करण्यात आले. 'वन्दे मातरम्'ने कार्यक्रमाची सांगता झाली. या अमृत-महोत्सव सन्मान सोहळ्याला विविध क्षेत्रांतील मान्यवरांसह मोठ्या संख्येने हिंदू बांधव उपस्थित होते.

# राजकीय पुढाऱ्यांनो वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी चर्चा करा; राजकारण नको!

**राज्यात** गुन्हेगारी दिवसेंदिवस वेगवेगळे रूप धारण करून वाढत आहे ही बाब सर्वसामान्यांच्या दृष्टीने व राज्याच्या दृष्टीने अत्यंत गंभीर बाब आहे. याचे जिवंत उदाहरण सर्वांसमोर आहे. परंतु राज्यात पक्ष-विपक्ष गुन्हेगारीवर आळा घालण्याच्या चर्चेपेक्षा राजकारण कसे करता येईल व आपली राजकीय पोळी कशी शेकता येईल याकडे संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांचे लक्ष लागल्याचे दिसून येते. यामुळे सर्वसामान्यांचा राजकीय पुढाऱ्यांवरून विश्वास कमी होऊ शकतो याला नाकारता येत नाही. नुकतेच कल्याण पूर्वचे भाजप आमदार गणपत गायकवाड आणि कल्याण पूर्वचे शिवसेना शहरप्रमुख महेश गायकवाड यांच्यामध्ये व्दारली येथील एका जमिनीच्या मुद्यावरून दिनांक २ फेब्रुवारी शुक्रवारला पोलिस ठाण्यातच झालेला वाद विकोपाला गेला. या वादात आमदार गणपत गायकवाड यांनी थेट हिललाइन पोलिस ठाण्यामधील वरिष्ठ पोलिस निरीक्षकांच्या दालनात महेश गायकवाड आणि राहुल पाटील यांच्यावर अंदाधुंद गोळीबार करीत ठार मारण्याचा प्रयत्न केला. यावरून स्पष्ट होते की आमदार (लोकप्रतिनिधी) ची गुन्हेगारी करण्याची हिंमत वाढल्याचे दिसून येते. कारण पोलिस ठाण्यात बंदुकीने अंधाधुंद गोळीबार करणे म्हणजेच गुंडगिरीला प्रोत्साहन देणे होय. याला आमदार (लोकप्रतिनिधी) म्हणता येणार नाही. अशा अट्टल गुन्हेगारांच्या मुसक्या सरकारने आवरायला पाहिजे व पोलिस विभागाला अशांवर कारवाई करण्याची खुली सुट द्यायला हवी. ठाण्याची घटनेला काही दिवस होत नाही तर,त्याचीच पुनरावृत्ती आपल्याला मुंबईत दिसून आली. कारण ठाण्यातील पोलिस ठाण्यात भाजप आमदाराने केलेल्या गोळीबाराचा धक्का कायम असतांनाच बोरिवलीमधील एका स्थानिक कार्यकर्त्याने दिनांक ९ फेब्रुवारीला शिवसेना उध्दव ठाकरे पक्षाचे माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांची गोळ्या झाडून हत्या केली. साडीवाटपाच्या कार्यक्रमासाठी बोलावून मॅरिस नरव्होना या कार्यकर्त्याने घोसाळकर यांच्यासमवेत 'फेसबुक लाइव्ह' केला व नंतर अभिषेक यांच्यावर दोन-तीन गोळ्या झाडल्या यानंतर याने स्वतःवरही गोळ्या झाडून आत्महत्या केली. म्हणजेच गुन्हेगारी कोणत्याही प्रकारची असो ती गुन्हेगारीच म्हणावी लागेल.याकरीता राज्यातील संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांनी पक्ष-विपक्षांनी एकत्र येऊन या विषयावर सविस्तर चर्चा करने अत्यंत गरजेचे आहे कारण सुरक्षेच्या दृष्टीने हा अत्यंत गंभीर विषय आहे. त्याचप्रमाणे राज्याच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून आणि सर्वसामान्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने पोलिस विभागाला आपण काय मदत करु शकतो अशा पध्दतीची सर्वोतोपरी मदत करण्याचा विचार करायला पाहिजे. कारण राज्यात किंवा देशात गुन्हेगारीची मुख्य जड ही राजकाणातुनच निर्माण होत असते. त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांनी कोणत्याही गुन्हेगारीचे किंवा गुन्हेगारांचे राजकारण करून व त्यांना खतपाणी देणे सर्वप्रथम बंद केले पाहिजे व राज्याच्या किंवा देशाच्या सुरक्षा यंत्रणेला सर्वतोपरी मदत करायला हवी. राजकीय पुढारी जर सुरक्षा यंत्रणेला मदत करणार नाही तर पोलिस विभाग काय करेल याचाही विचार सरकार, पक्ष-विपक्षांनी केलाच पाहिजे. पोलिस विभाग गुन्हेगारांना मोठ्या कठीण प्रसंगातून आपल्या जीवाची पर्वा न करता पकडतात व त्यांच्या कायदेशीर कारवाई करतात. परंतु राजकीय पुढारी गुन्हेगारांना खतपाणी घालतात हे राज्यात सध्याच्या परिस्थितीत घडत असलेल्या घटनेवरून लक्षात येते. त्यामुळे गुन्हेगारांवर वचक बसण्याकरीता पोलिस विभागाला कडक कारवाई करण्याकरीता सरकारने खुली सुट द्यायला हवी तेव्हाच गुन्हेगारीवर आळा बसेल.

**- रमेश कृष्णराव लांजेवार**

(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)

मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# ग्रंथालय चळवळीला बळ देण्याचा निर्धार; समारोप प्रसंगी मान्यवरांचे प्रतिपादन



छत्रपती संभाजीनगर, दि.१४ (प्रतिनिधी) - वाचन संस्कृती रुजविण्यात ग्रंथालय, वाचनालये ही महत्त्वाची भूमिका बजावतात. वाचकापर्यंत चांगले दर्जेदार साहित्य, पुस्तके नेण्याचे काम ह्याच संस्था करतात. त्यासाठी वाचन संस्कृती बळकट करण्यासाठी ग्रंथालय चळवळीला बळ देण्याचा निर्धार ग्रंथोत्सव २०२३ च्या समारोप प्रसंगी मान्यवरांनी व्यक्त केला.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय मुंबई व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, यांच्या विद्यमाने समता दर्शन वाचनालय सभागृह, समता नगर येथे 'छत्रपती संभाजीनगर ग्रंथोत्सव २०२३' चे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाचा आज समारोप झाला.या प्रसंगी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रंथालयांना प्रमाणपत्र वितरण आ. विक्रम काळे यांच्या हस्ते करण्यात आले.

समारोप प्रसंगी विधान परिषद सदस्य आ. विक्रम काळे, डॉ. धर्मराज वीर, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनिल हुसे, मसापचे कोषाध्यक्ष कुंडलिक अतकरे, ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक ऋषिकेश कांबळे, डॉ. राजशेखर बालेकर, मधुकर वैद्य, गुलाबराव मगर, जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे, समन्वय समिती सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनिल हुसे आदी मान्यवर उपस्थित होते.

**वाचन चळवळीसाठी ग्रंथोत्सव आवश्यक- आ. काळे**

आ. विक्रम काळे म्हणाले की, आजही जीवनात वाचनाचे महत्त्व टिकून आहे. दुर्दैवाने वाचनाची सवय लोप पावते की काय, असे सतत वाटत असते. कोरोना सारख्या जागतिक महामारीमुळे या समस्येत वाढच झाली. वाचन चळवळ टिकविण्यासाठी ग्रंथोत्सवासारख्या कार्यक्रमांचे आयोजन आवश्यक आहे, असे आ. काळे यांनी सांगितले. वाचन चळवळ वृद्धिंगत करण्यासाठी तसेच ग्रंथालय चळवळीशी निगडीत प्रश्न सोडविण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

**दर्जेदार पुस्तके वाचकांपर्यंत पोहोचवावी- डॉ. धर्मराज वीर**

समारोप समारंभाचे अध्यक्ष डॉ. धर्मराज वीर म्हणाले की, हल्ली सोशल मिडियामुळे वाचनावर परिणाम झाला आहे, अशी ओरड होत असली तरी जगभरात नवी पुस्तके वाचकांपर्यंत येण्याचे प्रमाण वाढतेच आहे. प्रयत्न लोकांपर्यंत दर्जेदार पुस्तके पोहोचविण्यासाठी होणे आवश्यक आहे. दर्जेदार पुस्तके लोकांपर्यंत पोहोचविण्यात ग्रंथालयांची भुमिका महत्त्वाची आहे,असेही डॉ. वीर यांनी सांगितले.ते म्हणाले की, देशाची प्रगती तेथील वाचनालयांच्या संख्येवरुन ओळखावी. ग्रंथालय चळवळीला चालना देण्यासाठी ग्रंथालय सेवकांना चांगला मोबदला मिळायला हवा,असेही प्रतिपादन त्यांनी केले.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनिल हुसे यांनी प्रास्ताविक तर डॉ. विवेक घोलप यांनी सूत्रसंचालन केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# मायबापाची सेवा 'न' करणारा; समाजाची सेवा काय करणार?

**प्रत्येक** मुलां-मुलींचे जन्मदाते आई -वडील हे या जगतातील सर्व श्रेष्ठ दैवत असतात, आई-वडील म्हणजे साक्षात 'विठ्ठल-रुख्मिनी' होत, अशा आई -वडिलांची सेवा ही साक्षात परमेश्वराची सेवा होय, आई-वडीलंपेक्षा श्रेष्ठ दैवत या जगतात कोणतेही नसताना त्यांच्या वृद्धापकाळात त्यांना बेसहारा सोडणे, वृद्धाश्रम मध्ये ठेवणे, त्यांना घराबाहेर हाकलून देणे एव्हढेच नव्हे तर क्षुल्लक कारणासाठी त्यांचे प्राण ही घेण्यास मागे पुढे न पाहणे त्यांना भीक मागायला प्रवृत्त करणे, त्यांना अनंत शारीरिक, मानसिक भावनिक यातना देणे, एव्हढेच नव्हे तर त्यांच्या अंत्यविधीला अनुपस्थित असणे ,त्यांच्या तिरडीला खांदा न देणे,भले माय-बाप वाईट असतील पण जन्म दात्यां बाबत एव्हढे वाईट चिंतने, ही आमची संस्कृती नाही, ही आम्हा भारतीयांची नीतिमत्ता सुद्धा नाही, त्यांची म्हातारपणात हेळसांड करणे यासारखे पाप या जगतात दुसरे कोणतेही नाही, ज्यांनी आम्हाला हे जग दाखविले, अत्यंत हाल अपेष्टा सहन करून आम्हाला लहानाचे मोठे केले, स्वतः उपाशी -तापाशी राहून आमचे चोचलेभरविले त्या माय-बापाला क्षुल्लक व किरकोळ समजून त्यांना बाजूला लोटून इतरांना मान -सन्मान देऊन त्यांचे पाया पडणे, त्यांचे आशीर्वाद साठी धडपणे,या सारखे पाप नाही, संत, महंत, टाटा, बिर्ला यांच्या शाबासकी पेक्षा आई-वडील यांची शाबासकी मिळणे, त्यांनी गालावरून हात फिरविणे, पाठीवरून हात फिरविणे यात, महा गोडवा साठवलेला असतो हे कदापिही विसरता येणार नाही, आईच्या व बापाच्या पाठीवरील थापीत जी गोडी आहे, जी मिठास आहे, जी शुभ भावनाआहे ती टाटा, बिर्ला, संत, महंत, पंत यांच्या थापीत नाही, ज्यांना आई -वडील आहे, ते खूप श्रीमंत आहेत, आई-वडील गरीब असणे वा आई -वडील श्रीमंत असणे ही मोठी कमाई नाही ते मुलां-मुलींच्या सहवासात असणे ही खरी कमाई आहे, ही खरी, खरी श्रीमंती आहे, हे कदापिही विसरता कामा नये, जो मायबापाची वृद्धापकाळात सेवा न करता त्यांना वृद्धाश्रमात ठेवतो, त्यांना वृद्धपकाळात अनंत यातना देतो तो देशाची व देशवाशियांची काय सेवा करेल?अशा मुलां-मुलींना समाजाची सेवा तरी करण्याचा अधिकार आहे का? समाजाने अशा व्यक्तींना देशाची,व समाजाची सेवा करण्याची संधी तरी द्यावी का? याचा जरूर आज आणि आजच विचार व्हावा अशी अपेक्षा आहे.



- धोंडीरामसिंह राजपूत

# सुपरहिट कन्नड चित्रपट 'न्याय रक्षक' येतोय अल्ट्रा झकास मराठी ओटीटीवर!

मुंबई, दि. १५ (प्रतिनिधी) - आईकडून मुलांना मिळणारं ज्ञान आणि संस्कार आयुष्याच्या जडणघडणीत पुरून उरत असतात. अशाच आई आणि मुलाची समाजाप्रती एक संघर्षमय कथा 'न्याय रक्षक' या कन्नड चित्रपटात दडून आहे. १९ फेब्रुवारी २०२४ रोजी अल्ट्रा झकास या मराठी ओटीटीवर चित्रपटाच्या मराठी रूपांतराचा वर्ल्ड डिजिटल प्रीमियर होणार असून प्रेक्षकांना आई आणि मुलाच्या विलक्षण नात्याची अनुभूती येणार आहे.

सत्यासाठी जीव देणाऱ्या सत्यवादी आईचा सत्यवादी मुलगा समाजाचा प्रतिनिधी होऊन समाजासाठी लढतो आहे. हा लढा समाजाचं शोषण करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांच्या विरोधात आहे. प्रस्थापित राजकीय पुढाऱ्यांच्या होणाऱ्या शोषणापासून अखंड समाजाला वाचवू शकेल का चित्रपटाचा नायक? या प्रश्नाचं उत्तर हे चित्रपटात मिळणार आहे.

'प्रत्येक आठवड्याला नव्या चित्रपटांच्या माध्यमातून आम्ही प्रेक्षकांचं मनभरून मनोरंजन करत आहोत. या आठवड्यात सुपरहिट कन्नड चित्रपट




'न्याय रक्षक' मराठी भाषेत मराठी प्रेक्षकांसाठी सादर करताना अत्यंत आनंद होत आहे. रसिकांना चित्रपट नक्कीच आवडेल अशी मनापासून आशा आहे.' असे अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रा.लिमिटेडचे सी.इ.ओ. श्री.सुशीलकुमार अग्रवाल म्हणाले.

# खुलताबाद तालुक्यात वंचित बहुजन आघाडीची मेळावा नियोजन बैठक संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि. १५ (प्रतिनिधी) - वंचित बहुजन आघाडी औरंगाबाद पश्चिम जील्ह्यांतर्गत खुलताबाद तालुक्यात आज दिनांक १४ फेब्रुवारी २०२४ रोजी दु. ०१:३० वा. खुलताबाद तालुका संपर्क कार्यालय येथे २८ फेब्रुवारी २०२४ रोजी होणाऱ्या मेळाव्याच्या अनुषंगाने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदरील बैठकीस जिल्हा अध्यक्ष योगेश गुलाबराव बन, कोषाध्यक्ष गोविंद वसंत सुरवसे, तालुका अध्यक्ष मुक्तार सय्यद, महासचिव राजाराम घुसळे, महासचिव अण्णा बनकर, सचिव अकबर शेख, सदस्य गवळी काका, नव्याने स्थापन होत असलेल्या वाहन चालक मालक संघटनेचे सालिमोद्दिन शेख आदी पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीत सर्वानुमते २८ फेब्रुवारी ऐवजी २७ फेब्रुवारी रोजी मेळावा घेण्याचे ठरले आणि कन्नड तालुका अध्यक्ष यांच्याशी संवाद साधून कन्नडमध्ये २७ ऐवजी २८ तारीख मेळाव्यासाठी देण्यात आली आहे.

सदरील मेळावा शहराच्या मुख्य ठिकाणी असावा या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, खुलताबाद येथे कार्यक्रम घेण्याचे ठरले आहे. सदरील कार्यक्रमात नागरिकांची उपस्थिती असावी म्हणून प्रामुख्याने गायरान धारक व अतिक्रमण धारक यांचा महत्वाचा मुद्दा असून या मुद्द्यावर विशेष भर देण्यात यावी सोबतच सद्यस्थितीतील महागाई, बेरोजगारी, खाजगीकरण व भ्रष्टाचारी सत्ताधारी राजकारणी यांच्या नाकर्तेपणाची सामान्य जनतेला होत असलेले नुकसान यावर लक्ष देणे गरजेचे आहे करीता हे सुद्धा मुद्दे कार्यक्रमाच्या प्रसिद्धीत घेणे याबत चर्चा झाली.

**महत्वाची सूचना -** दिनांक १६ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११:०० वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, खुलताबाद येथे वंचित बहुजन आघाडी खुलताबाद तालुका वाहन चालक मालक संघटनेची नियुक्ती पत्रक वाटप व सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. तरी सर्व जिल्हा पदाधिकारी यांना विनंती करण्यात येते की पण उपस्थित राहावे.

# ज्येष्ठ नागरीकांच्या आनंददायी जिवनासाठी ज्येष्ठ नागरिक मालमत्ता हक्काबाबत उपक्रम राबविणार- विभागीय आयुक्त मधुकरराजे अर्दड

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- आपल्या पाल्यांपासून दुर्लक्षितव हक्कांपासून वंचित असलेल्या ज्येष्ठ नागरीकांचे वृध्दापकाळातील आयुष्य सुखकर, आनंददायी, आरोग्यवर्धक व तणावमुक्त होण्यासाठी ज्येष्ठ नागरीकांसाठी असणाऱ्या शासनाच्या विविधयोजना व कायदेशीर तरतुदी यांचा समन्वय साधुन जेष्ठांना दिलासा देणारा ज्येष्ठ नागरिकमालमत्ता हक्काबाबतचा उपक्रम छत्रपती संभाजीनगर विभागात राबविण्यात येणार असल्याचेविभागीय आयुक्त मधुकरराजे अर्दड यांनी आज सांगितले.

विभागीय आयुक्त कार्यालयातील सभागृहात विभागीय आयुक्त श्री.अर्दड यांनी याबाबत पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी उपायुक्त नयना बोंदर्डे, उपायुक्त अनंत गव्हाणे, उपायुक्त जगदिश मिनियार, उपायुक्त सुरेश बेदमुथा, नगरपालिका प्रशासन उपायुक्त ॲलीस पोरे सामाजिक कार्यकर्त्या डॉ. पदमा तापडीया विविध विभागाचे विभागप्रमुखउपस्थित होते.

विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड म्हणाले, ज्यांनी आपल्यालाजन्म दिला, कुशीत वाढवले, मोठे केले, प्रेमाचा वर्षाव केला त्या वृध्द आई- वडीलांनाआयुष्याच्या शेवटी केवळ स्वार्थ, मोह, तिरस्कार, मत्सर व अहंकारातून अथवा गैरसमजातूनबऱ्याच ठिकाणी त्रास देण्याच्या घटना समाजामध्ये घडत असल्याचे दिसून येते. घरातील एकअडगळ म्हणून वृध्दांकडे बघण्याऱ्या लोकांच्या संख्येमध्ये वाढ होताना दिसते आहे. सामाजिकन्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णयान्वये 'राज्याचे सर्वसमावेशक ज्येष्ठनागरिक धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाकडून विभागनिहाय निर्देश यापुर्वीच निर्गमीतकेले असल्याचे त्यांनी सांगितले.

आई-वडील, ज्येष्ठ नागरिक यांच्या वृध्दापकाळात त्यांच्यामुलभूत हक्कांचे संरक्षण व्हावे, त्यांना अन्न, वस्त्र, निवारा व त्याच बरोबर इतर मुलभूतसोईसुविधा यामध्ये वैद्यकीय उपचार, घरामध्ये सन्मानाची वागणूक या बाबी उपलब्ध व्हाव्यात,या हेतूने भारत सरकारने ज्येष्ठ नागरिक, पालकांना सन्मानाने आयुष्य जगण्यासाठी आई-वडीलांचाव ज्येष्ठ नागरीकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम, २००७ हा कायदा अस्तित्वात आणला आहे. अधिनियमाप्रमाणे जे आई-वडील व ज्येष्ठ नागरिक हे आपल्या स्वतःच्या उत्पन्नामधून किंवा स्वतःच्या मालमत्तेमधून स्वतःचा निर्वाह करण्यास असमर्थ ठरतात.असे आई-वडील तसेच ज्येष्ठ नागरिक ज्यांना अपत्य आहे, ते त्यांच्या मुलांविरुध्द, नातवाविरुध्द व जे ज्येष्ठ नागरिक निपुत्रिक आहे ते उक्त अधिनियमाच्या कलम २ (छ) मध्ये नमुद'नातेवाईक' या संज्ञेत बसणाऱ्यांविरुध्द नर्वाह प्राप्त करण्यासाठी अधिनियमातीलकलम ५ प्रमाणे सक्षम अधिकाऱ्यांकडे अर्ज करु शकतात, अशी तरतुद असल्याचे श्री. अर्दडयांनी सांगितले.

ज्येष्ठ नागरिक यांना सन्मानाने जीवन जगता यावे या दृष्टीने त्यांच्या गरजांच्या मर्यादित त्याचा निर्वाहभत्ता चालविणे हे मुलांचे व कलम २ (छ) मध्ये नमुद नातेवाईकांचे दायित्व निश्चित केलेआहे. अधिनियमातील तरतूद क्रमांक ५ प्रमाणे ज्येष्ठ नागरिक आई-वडीलांच्या किंवा आजी- आजोबांच्या बाबतीत अज्ञानअसणाऱ्या त्यांच्या एका किंवा अधिक मुलांविरुध्द व निपुत्रिक ज्येष्ठ नागरिकांच्या बाबतीत कलम २ (छ) प्रमाणे नातेवाईक असणाऱ्यांच्या ताब्यात अशा ज्येष्ठ नागरिकांची मालमत्ता असेल किंवा अशी मालमत्ता या ज्येष्ठ नागरिकांकडून वारसा हक्काने त्याला मिळणार असेलअशा नातेवाईकाविरुध्द निर्वाह प्रदान करण्याच्या अनुषंगाने अर्ज सादर करता येणार असल्याचेहीविभागीय आयुक्त श्री. अर्दड म्हणाले.

अधिनियमाच्या कलम २३ प्रमाणे या अधिनियमाच्या प्रारंभ नंतरकोणत्याही ज्येष्ठ नागरिकांनी एखाद्या व्यक्तीला तो त्या ज्येष्ठ नागरिकाला मुलभूतसुविधा पुरवेल या शर्तीस अधिन राहून दान अथवा अन्य प्रकारे आपली मालमत्ता हस्तांतरितकेली असेल आणि त्या व्यक्तीने त्या ज्येष्ठ नागरिकाला मुलभूत सुविधा पुरविण्यास नकारदिला असेल किंवा तो त्यासाठी असफल ठरलेला असेल तर असे झालेल्या मालमत्तेचे हस्तांतरणलबाडीचे किंवा जबरदस्तीने किंवा गैरवाजवीप्रमाणे केले असल्याचे मानण्यात येईल व न्यायाधिकरणात असे हस्तांतर अवैध आहे असे घोषित करता येईल अशी तरतुद असल्याचा उल्लेखही श्री. अर्दड यांनी केला.

अधिनियमातील कलम २ (छ) नुसार 'नातेवाईक' या व्याख्येतअसणाऱ्या व निर्वाह भत्त्याच्या लाभापासून वंचित असणाऱ्या गरजू ज्येष्ठ नागरिकांचीवारसा हक्कात असलेली अथवा स्व अर्जित मालमत्ता ज्या पाल्यांच्या ताब्यात असेल, हस्तांतरितकरण्यात आली असेल अशा पाल्यावर दायित्व निश्चित करणे आवश्यक आहे तसेच सदर अधिनियमातील कलम ५ प्रमाणे दायित्व असलेल्या ज्येष्ठांचे संगोपण न करणाऱ्या, संगोपणास प्रतिसादन देणाऱ्या पाल्यांच्या विरुध्द सक्षम प्राधिकाऱ्याकडे तक्रार अर्ज प्राप्त झाल्यासअधिनियमातील कलम २३ मधील प्रचलित तरतुदी विचारात घेत अशा वंचित ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कामध्ये प्रशासकीय पातळीवरुन निर्णय घेण्याची गरज असल्याचे श्री. अर्दड यांनी स्पष्ट केले.

मराठवाडयात राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व तलाठी सजा अंतर्गत ६० वर्षे व त्यावरील वय असलेल्या आई वडील व ज्येष्ठ नागरिकाना'आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम, २००७ या कायद्याबद्दल मोठ्या प्रमाणात जनजागृती होईल या दृष्टीने जिल्हाधिकारी कार्यालय व त्यांचे अधिनस्तउप विभागीय अधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय, मंडळ अधिकारी व तलाठी सजा यांचेमार्फत आवश्यक पाऊले उचलण्यात येणार आहेत.

महसुली अभिलेखात फेर बदल होत असताना किंवा वाटणीच्या आधारावर फेरबदल करताना संबंधित घरातीलआई-वडील, आजी-आजोबा व ज्येष्ठ नागरिक यांचा उदरनिर्वाह यासाठी योग्य तेवढी मालमत्ताठेवण्यात आली आहे किंवा कसे? किंवा फेर बदल करतांना पालकांच्या पुढील आयुष्यात काळजीसंदर्भाने अटी व शर्ती नमुद केल्या आहेत का या बाबी विचारात



घेऊनच असा बदल करण्यात यावा. महसुली अभिलेखात फेर बदल अथवा वाटणीनंतर आई-वडील अथवा ज्येष्ठ नागरीकांची मुले (मुलगा-मुलगी) किंवा नातेवाईक त्यांची काळजी घेत आहेत का? याबद्दल तलाठी सजानिहाय खात्री करतील व या बाबीकडे लक्ष देवून कार्यवाही करतील.

उपक्रमाची अंमलबजावणी करताना जर संबंधित व्यक्तीचा मुलगा-मुलगी किंवा नातेवाईक त्यांच्या आई-वडीलांची,ज्येष्ठांची काळजी घेत नसतील किंवा त्यांना सन्मानाने आयुष्य व्यतीत करु देत नसतीलव मालमत्ता हस्तांतराणाचे वेळी दिलेल्या शब्दाचे पालन करत नसतील, असे संबंधित आई-वडील, वयोवृध्द व्यक्ती, ज्येष्ठ नागरीक जर तोंडी तक्रार करत असतील तर संबंधित तलाठी यांनीत्यांची लेखी तक्रार देण्यास मदत करुन आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याणअधिनियम, २००७ मधील तरतुद क्रमांक २३ प्रमाणे संबंधित मुलाकडून तसेच नातेवाईकांकडूनसंबंधित मालमत्ताधारक ज्येष्ठांना मालमत्तेचा पुर्नहक्क देण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यासप्रस्ताव सादर करावा.

जर सबंधित व्यक्तीचा मुलगा-मुलगी किंवा नातेवाईक यांच्याकडून आई-वडील किंवा ज्येष्ठ नागरिकाच्यानावे पुर्नहक्काने मालमत्तेची नोंद घेतल्यानंतर अशा ज्येष्ठांच्या जीवितास व मालमत्तेस धोका निर्माण होऊ शकतो अशा प्रसंगी असे आई-वडील व ज्येष्ठ नागरिक यांचे चरितार्थ व कल्याणासाठी नियम, २०१० चे प्रकरण ६ मधील नियम २० नुसार ज्येष्ठ नागरिकांच्या जीविताचेव मालमत्तेचे संरक्षण करण्याबाबत कृती आराखडा विनिर्दिष्ट करण्यात आला आहे. त्याचप्रमाणेपोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या सर्व ज्येष्ठ नागरिकांची यादी संबंधित तलाठयांकडेअद्ययावत ठेवण्यासोबतच त्यांना महिन्यातून एकदा भेट द्यावी लागणार आहे.

राज्यात उपविभागीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील निर्वाह प्राधिकरणामार्फत आई-वडील व ज्येष्ठनागरिक यांचे चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम आणि त्या अंतर्गत २३ जून, २०१० च्या अधिसूचनाअन्वये राज्यात लागू केलेले नियम, २०१० ची काटेकोर अंमलबजावणी करुन दुर्लक्षित व वंचितआई-वडील, ज्येष्ठ नागरिकांना निर्वाह खर्च मिळवून देण्याची कार्यवाही केली जाणार आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णयान्वये जिल्हास्तरावर संबंधीत जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय संनियंत्रण समितीने सदर उपक्रमाचे सुयोग्य नियोजन करुन प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करावी. तालुका स्तरावर तहसिलदार याचे अध्यक्षतेखाली समन्वय समितीस्थापन करुन सदर समितीची वेळोवेळी आढावा बैठक घ्यावी, तसेच सदरील कार्यवाही करतांना वयोवृध्द आई-वडील व ज्येष्ठ नागरिक दुर्लक्षित व वंचित राहणार नाहीत, निर्वाहच्या तक्रारी उद्भवणार नाहीत याबाबत सर्व संबंधित अधिकारी तसेच कर्मचारी यांना जाणीव करुन द्यावी तसेच उपक्रमाशी निगडीत सर्व संबंधितांनी आपसांत योग्य समन्वय ठेवून हा उपक्रम त्यांच्या कार्यक्षेत्रात प्रभावीपणे राबवावा, असे निर्देश यंत्रणेला देण्यात आले आहेत.

# ग्रॅमी पुरस्कारांमध्ये भारतीय संगीतकारांचा डंका! शंकर महादेवन, झाकीर हुसेन यांनी मारली बाजी

लॉस एंजेलिस, दि. १५ (वृत्तसंस्था) - यंदा लॉस एंजेलिसमध्ये ६६ व्या ग्रॅमी पुरस्कार २०२४ चे आयोजन करण्यात आले होते. संगीत उद्योगातील उत्कृष्ट कामगिरीसाठी युनायटेड स्टेट्सच्या रेकॉर्डिंग अकादमीद्वारे कलाकारांना ग्रॅमी पुरस्कार दिले जातात. यात भारतीय संगीतकारांचे वर्चस्व पाहायला मिळाले. भारतीय गायक शंकर महादेवन आणि तबलावादक झाकीर हुसेन यांच्यासह चार संगीतकारांनी ग्रॅमी पुरस्कार पटकावला आहे.

संगीतकार शंकर महादेवन यांच्या शक्ती बँडच्या धीस मुवमेंट अल्बमचा यंदाच्या ग्रॅमी २०२४ मध्ये गौरव करण्यात आला. तसेच झाकीर हुसैन यांना बेस्ट ग्लोबल म्युझिक परफॉर्मन्ससाठी त्यांच्या पाश्तो नावाच्या अल्बमला गौरविण्यात आले. त्यात बेला फ्लेक, एडगर मेयर आणि प्रसिद्ध बासरीवादक राकेश चौरासिया यांच्या नावाचा समावेश होता. यंदाच्या ग्रॅमी पुरस्कार सोहळ्यामध्ये झाकीर हुसैन यांनी सादरीकरणही केले.

'ॲज वी स्पिक' या अल्बमसाठी देखील झाकीर हुसैन आणि राकेश चौरासिया यांना गौरविण्यात आले. अशा प्रकारे यंदा तीन ग्रॅमी मिळाले असून राकेश चौरासिया यांना देखील दोन ग्रॅमीनं गौरविण्यात आले आहे. भारतीय संगीतकारांनी विख्यात अशा ग्रॅमी पुरस्कारावर आपल्या देशाची मोहोर उमटविल्याने देशभरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. यावेळी मनोरंजन क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करत त्यांचे कौतुक करणाऱ्या पोस्ट शेअर केल्या आहेत.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो.:९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# जिल्हाधिकाऱ्यांनी स्विकारला पदभार

## प्रशासन गतिमान, पारदर्शक आणि संवेदनशील करण्यास सर्वोच्च प्राधान्य-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज सकाळी आपला पदभार स्विकारला. जिल्ह्याचे प्रशासन गतिमान, पारदर्शक आणि संवेदनशील करण्यास आपले सर्वोच्च प्राधान्य असेल,असा मनोदय जिल्हाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

प्रभारी जिल्हाधिकारी म्हणून पदभार सांभाळणारे मनपा आयुक्त जी. श्रीकांत यांच्याकडून श्री. स्वामी यांनी आपला पदभार स्विकारला. जी. श्रीकांत यांनी श्री. स्वामी यांचे स्वागत केले. अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, निवासी उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी मनोदय व्यक्त केला की, छत्रपती संभाजीनगर जिल्हा हा सांस्कृतिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचा जिल्हा आहे. पर्यटन विकासासाठी अधिक काम करणे. आता प्राथम्याने निवडणूक प्रक्रिया राबविणे, जिल्ह्यातील टंचाई विषयक



उपाययोजना करणे या विषयांना प्राधान्य असेल. त्याच बरोबर जिल्ह्याचे प्रशासन हे गतिमान, पारदर्शक आणि संवेदनशील करणे हे उद्दिष्ट असेल. प्रशासना बद्दल जनतेच्या मनात कोणतेही किंतू परंतू राहु नये यासाठी गतिमान, पारदर्शक आणि संवेदनशीलतेने काम करण्यास आपले प्राधान्य असेल.

# आम्ही लढणारे आहोत पाठ दाखवून पळणारे नाही-प्रशासक

## प्रशासकीय यंत्रणा कोणत्याही परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी सक्षम; प्रशासनाच्या वतीने योध्यांचा सन्मान

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- आम्ही लढणारे आहोत पाठ दाखवून पळणारे नाही.आता कोणत्याही परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज आहे असे प्रतिपादन मा.आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांनी केले.ते मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र येथे गॅस दुर्घटनेत आपल्या जीवाची पर्वा न करता शहराला वाचविण्यासाठी योगदान दिलेल्या योध्यांचा सन्मान सोहळा कार्यक्रम प्रसंगी बोलत होते.

दि.०१ फेब्रुवारी २०२४ रोजी जालना रोड एन ०३ परिसरात वसंतराव नाईक महाविद्यालय समोर एक गॅस टँकर दुभाजकला धडकून दुर्घटना ग्रस्त झाले होते.या टँकर मधून गॅस गळती सुरू झाली होती. आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत,पोलीस आयुक्त मनोज लोहिया यांच्या मार्गदर्शनाखाली

मनपा , पोलीस ,आर टी ओ,आपत्ती व्यवस्थापन विभाग अधिकारी कर्मचारी यांनी या आकस्मित मोठ्या दुर्घटने पासून जीवित व वित्त हानी चे रक्षण करण्याकरिता आपल्या जीवाची बाजी लावली.या वेळी योगदान दिलेल्या योद्यांचा आज सन्मान करण्यात आला.

महानगरपालिकेच्या मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र येथे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यांच्या वतीने हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.या सोहळ्याचे अध्यक्ष स्थानी प्र.जिल्हाधिकारी तथा आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांची उपस्थिती होती तर प्रमुख पाहुणे म्हणून उप आयुक्त (गुन्हे) नितीन बघाटे हे होते. तर यांचे सोबत व्यासपीठावर अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, सौरभ जोशी,उप आयुक्त सोमनाथ जाधव, अंकुश पांढरे,नंदा गायकवाड,आरोग्य



वैद्यकीय अधिकारी डॉ पारस मंडलेचा,मुख्य अग्निशमन अधिकारी शिवाजी झनझन,आपत्ती व्यवस्थापन कक्ष प्रमुख स्वप्नील सरदार यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वप्नील सरदार यांनी केले तर आभार प्रदर्शन अतिरिक्त आयुक्त सौरभ जोशी यांनी केले.

यावेळी विशेष सन्मान म्हणून आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत व पोलीस आयुक्त नितीन बघाटे यांना सर्वांनी उभे राहून मानवंदना दिली. मान्यवरांच्या हस्ते प्रतिनिधिक स्वरूपात पोलीस, अग्निशमन , आर टी ओ, आरोग्य, माजी सैनिक, आपत्ती व्यवस्थापन विभाग अधिकारी कर्मचारी यांचा सन्मान चिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना नितीन बघाटे म्हणाले की,सर्वांच्या सहकार्यामुळे मोठी दुर्घटना टळली.कोणत्याही परिस्थितीत आपला आत्म विश्वास दृढ असला पाहिजे या बळावर आपण कोणत्याही परिस्थितीला सामोरे जाऊ शकतो. सर्व सहकार्यांनी आपला जीव धोक्यात घालून असंख्य जीवांचे रक्षण केले आहे तसेच शहरातील नागरिकांनी केलेल्या सहकार्याचे आभार सुध्दा त्यांनी यावेळी मानले.फक्त आदेश देऊन नेतृत्व करता येत नाही तर त्या ठिकाणी दृढपणें उभे राहून कोणतीही परिस्थिती हाताळणे त्याला सामोरे जाणे हे खरे नेतृत्व असते असे ते म्हणाले.

आपल्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी मा.जी श्रीकांत म्हणाले की,आम्ही पाठ दाखवून पळणारे नाही तर लढणारे आहोत.प्रशासकीय यंत्रणा कोणत्याही परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी सक्षम,सज्ज आहे.त्यांनी अग्निशमन दलाच्या अधिकारी व जवानांचे विशेष कौतुक केले.त्या सोबतच आपत्ती व्यवस्थापन,पोलीस,आर टी ओ,पाणी पुरवठा ,आरोग्य यंत्रणा ,नागरी मित्र पथकाचे कर्मचारी , स्वछता निरीक्षक,वसुली कर्मचारी यांच्या धाडसाचे कौतुक केले. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यांच्या वतीने या योध्याना पाच हजार रुपये बक्षीस देण्यात येणार आहे असे ते म्हणाले.

# महानगरपालिकेचे विद्यार्थी आकाशवाणीवर झळकणार

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय हर्सूलगाव या शाळेतील विद्यार्थी दि २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त ङमराठी असे आपली मायबोलीङ हा कार्यक्रम छत्रपती संभाजीनगर आकाशवाणी केंद्रावर सादर होणार आहे. या कार्यक्रमात महानगरपालिकेचे विद्यार्थी आपले कलागुण सादर करणार आहेत. रविवार दिनांक १८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ०६. वाजून ३५ मिनिटांनी आकाशवाणी छत्रपती




संभाजीनगर केंद्रावर , एफएम १०१.७ यावर तसेच संपूर्ण राज्यात त्याचे थेट प्रक्षेपण होणार आहे. आयुक्त तथा प्रशासक जी. श्रीकांत यांच्या प्रेरणेतून मनपा चे विद्यार्थी आता आकाशवाणीवर झळकणार आहेत. या कार्यक्रमासाठी उपायुक्त नंदा गायकवाड व शिक्षणाधिकारी , भारत तिनगोटे मुख्याध्यापक उर्मिला लोहार यांचे विशेष मार्गदर्शन लाभले असून कार्यक्रमाची संकल्पना, लेखन आणि दिग्दर्शन मनपा हर्सूल शाळेतील शिक्षक संजय कुलकर्णी यांचे आहे. कार्यक्रमात आर्यन राजगुरे, सुयश ढगे, सृष्टी गौतम, यशोदा खेत्रे, आणि रेणुका वाघ यांनी सहभाग घेतला आहे . कार्यक्रम सर्व विद्यार्थी पालक आणि सर्व नागरिक यांनी ऐकावा असे आवाहन मनपा शिक्षण विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर तलाव, मालोजीराजे यांची गढी सुशोभिकरण लवकर पूर्ण करावे- डॉ. भागवत कराड

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- घृष्णेश्वर मंदिराजवळील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर तलाव, त्यातील संगित कारंजे, मालोजीराजे भोसले यांची गढी या ऐतिहासिक वास्तुंचे सुशोभिकरण लवकर पूर्ण करुन तसेच देखभाल, दुरुस्ती, कार्यान्वयन या प्रक्रिया पूर्ण करुन या वास्तू पर्यटकांना खुल्या कराव्या,असे निर्देश केंद्रीय अर्थराज्य मंत्री डॉ. भागवत कराड यांनी आज येथे दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात या प्रकल्पाचा आढावा डॉ. कराड यांनी घेतला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, पुरातत्व विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, घ्रुष्णेश्वर मंदिर व्यवस्थापन इ. अधिकारी उपस्थित होते.

हा प्रकल्प उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून राबविण्यात येत आहे. त्यात वेरुळ येथील घ्रुष्णेश्वर मंदिर परिसरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर तलाव येथे संगीत कारंजे तसेच ध्वनी व प्रकाश सादरीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. या कामांच्या उर्वरीत तांत्रिक पूर्तता करुन हा प्रकल्प पर्यटकांना खुला करावा. तसेच मालोजीराजे यांच्या गढीचे सुशोभिकरण पूर्ण करावीत. ही कामे पुरातत्व विभागाच्या निर्देशाप्रमाणे व त्यांच्या मान्यतेने पूर्ण करण्यात यावी व पर्यटकांना खुली करावी, असे निर्देश डॉ. कराड यांनी दिले.

## जिल्हाधिकारी कार्यालयात संत सेवालाल जयंतीनिमित्त अभिवादन

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- संत सेवालाल यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज अभिवादन करण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे यांच्या हस्ते माल्यार्पण करुन संत सेवालाल यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. नायब तहसिलदार बारवाल तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी यावेळी उपस्थित होते.


## मुख्याधिकारी नगर परिषद वैजापूर

जा.क्र.नपवै/कावि/साबाविभाग/२०२४/३२९ दिनांक :- १४/०२/२०२४

### ई-निविदा सूचना क्र. २१ सन २०२३-२४

वैशिष्ट्यपूर्ण योजने अंतर्गत विविध विकास कामासाठी ई निविदा मुख्याधिकारी नगर परिषद यांचेकडून मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशील दि. १४/०२/२०२४ पासून ते दि.२१/०२/२०२४ पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे..

स्वाक्षरीत
मुख्याधिकारी
नगर परिषद वैजापूर



## जल व भूमि व्यवस्थापन संस्था (वाल्मी)

(महाराष्ट्र शासन, मृद व जलसंधारण विभाग पुरस्कृत स्वायत्त संस्था)
पत्र पेटी क्र.५०४, कांचनवाडी, पैठण रोड
छत्रपती संभाजीनगर ४३१००५, महाराष्ट्र (भारत)

दूरध्वनी क्र.६१-२३७९१५९-०२४० Website: www.walimi.org
फॅक्स क्र.२३७९०३६-०२४० E-mail:admn@walmi.org

### ई-निविदा सुचना क्र.०५ सन २०२३-२४

प्रशासकीय अधिकारी, जल व भूमि व्यवस्थापन संस्था, कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर हे वाल्मी संस्थेमधील खालील कामाकरिता वैध नोंदणीकृत सक्षम कंत्राटदाराकडुन ई- निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार प्रशासकीय अधिकारी, वाल्मी यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र | कामाचे नाव | निविदा किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | बयाना रक्कम | ई-निविदा संचाची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Construction of Entrance Gate of Water and Land Management Institute (WALMI) At Walmi, Chhatrapati Sambhajinagar. | Rs.11901393/- | १२ (बारा महिने) | Rs.119014/- | Rs.2360/- |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी** दिनांक १६/०२/२०२४ १४.०० वा पासून ते २३/०२/२०२४ १४:०० पर्यंत
**ई-निविदा उघडने (शक्य झाल्यास):** दिनांक २६/०२/२०२४ वेळ: सकाळी ११:०० वाजता (तांत्रिक लिफाफा)
खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
http://mahatenders.gov.in
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
प्रशासकीय अधिकारी, वाल्मी, छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयातील सुचना फलक
जा. क्र. ४९७ दिनांक १२/०२/२०२४
महासंचालक वाल्मी यांचे कार्यालय,
प्रशासकीय अधिकारी,
जल व भूमि व्यवस्थापन संस्था, छत्रपती संभाजीनगर

स्वाक्षरीत/-
प्रशासकीय अधिकारी
वाल्मी, छत्रपती संभाजीनगर

डीजीआयपीआर/२०२३-२०२४/८३०४



## नगर परिषद वैजापूर जि.छत्रपती संभाजीनगर

फोन नंबर (०२४३६-२२२०३६) फॅक्स नंबर (०२४३६-२२५२५६)
Email : npvaijapur@gmail.com

जा.क्र.नपवै/कावि/६/२०२४/३३५ दिनांक : १५/०२/२०२४

### निविदा सुचना

वैजापूर नगर परिषद, वैजापूर हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाची खालील दर्शविलेल्या कामासाठी अनुभवी योग्यत्या वर्गातील नोंदणीकृत गुत्तेदाराकडून/एजन्सी धारकाकडून निविदा मागवित आहे. कोरे निविदा फॉर्म सुटीचे दिवस वगळून **दि.२२/०२/२०२४** पर्यंत कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत खालील प्रमाणे निश्चित किंमत जमा केल्यानंतर नगर परिषद कार्यालयात सार्वजनिक बांधकाम विभागात विकत मिळतील.

१) गुत्तेदाराने मोहोरबंद निविदा दोन लिफाफा पद्धतीत मुख्याधिकारी, नगर परिषद वैजापूर यांचेकडे **दिनांक २३/०२/२०२४** रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत सादर कराव्यात. २) निविदा सोबत बयाणा रक्कम रोख जमा करणे आवश्यक आहे. ३) धनादेश किंवा दर्शनी हुंडी स्वीकारली जाणार नाही. ४) जमा केलेल्या बयाणा रकमेचा पावती क्रमांक सिलबंद पाकीटावर नमुद करावा. ५) बयाणा रक्कमे शिवाय निविदा स्विकारली जाणार नाही. ६) प्राप्त झालेल्या निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी ठिक ५.०० वा. मा.मुख्याधिकारी यांच्या दालनात उपस्थिता समक्ष उघडण्यात येतील. ७) मान्य निविदा धारकाच्या बिलातून अनामत, आयकर, GST, कामगार उपकर, रॉयल्टी इत्यादीची नियमानुसार कपात करण्यात येईल. ८) इतर अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळून न.प.बांधकाम विभागात विनामुल्य पहावयास मिळतील. ९) खालील कामासाठी (Price Escal Action) Clause लागु राहणार नाही. १०) भारत सरकार राजपत्र दि.८/१/२०२१ नुसार EPF रजिष्ट्रेशन बंधनकारक राहील. ११) कोणतीही निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार न.प.ने राखुन ठेवला आहे. (दुसरी वेळ)

**कामाचा तपशिल खालील प्रमाणे.**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | बयाना रक्कम | अनामत रक्कम | टेंडर फोर्म फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैजापूर शहर अंतर्गत फुलेवाडी रोड लगत श्री दाने पाटील यांचे घर ते श्री निकम यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे. | ८४११०८ | १६८२२ | ६७२८९ | १००० | ६ महिने |
| २ | वैजापूर शहर अंतर्गत शिक्षक कॉलनी येथे श्री कुंदे यांचे घर ते श्री महाजन सर यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे. | ८४१२७६ | १६८२६ | ६७३०२ | १००० | ६ महिने |
| ३ | वैजापूर शहर अंतर्गत श्री त्रिभुवन सर ते श्री सोमिलाल राजपूत यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे. | ८४०९४० | १६८१९ | ६७२७५ | १००० | ६ महिने |
| ४ | वैजापूर शहर अंतर्गत लक्ष्मीनगर येथे गंगापूर रोड ते गणपती मंदिर पर्यंत सिमेंट रस्ता करणे. | ८३८५१३ | १६७७० | ६७०८१ | १००० | ६ महिने |
| ५ | वैजापूर शहर अंतर्गत लक्ष्मीनगर येथे श्री बोहरा यांचे घर ते श्री काकडे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे. | ८३८८१६ | १६७७६ | ६७१०५ | १००० | ६ महिने |
| ६ | वैजापूर शहर अंतर्गत श्री जगताप यांचे घर ते श्री राउत ते श्री नन्नवरे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे. | ८३८८१६ | १६७७६ | ६७१०५ | १००० | ६ महिने |
| ७ | वैजापूर शहर अंतर्गत उक्कडगाव रोड ते श्री दीपक साळुंके यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे. | ८४१२५३ | १६८२५ | ६७३०० | १००० | ६ महिने |
| ८ | वैजापूर शहर अंतर्गत स्वामी समर्थ केंद्रासमोरील रस्ता सिमेंट रस्ता करणे, | ८३८३५७ | १६७६७ | ६७०६९ | १००० | ६ महिने |
| ९ | वैजापूर शहर अंतर्गत येवला रोड लगत श्री ठोंबरे ते श्री राउत ते श्री जगताप यांचे दुकान पर्यंत सिमेंट रस्ता करणे. | ८४११०६ | १६८२२ | ६७२८८ | १००० | ६ महिने |
| १० | वैजापूर शहर अंतर्गत धरणग्रस्त नगर येथे श्री भोसले ते श्री सातपुते यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे. | ८३८३५८ | १६७६७ | ६७०६९ | १००० | ६ महिने |
| ११ | वैजापूर शहर अंतर्गत सुभद्रा नगर येथे सिमेंट रस्ता करणे. | ८४०८६६ | १६८१७ | ६७२६९ | १००० | ६ महिने |
| १२ | वैजापूर शहर अंतर्गत आनंद नगर येथील ओपन स्पेस ते १२ मी. रोड पर्यंत सिमेंट रस्ता करणे. | ८४०९२६ | १६८१९ | ६७२७४ | १००० | ६ महिने |
| १३ | वैजापूर शहर अंतर्गत अहिल्याबाई नगर येथे श्री गणेश शिंदे ते श्री मालकर यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे. | ८४०९२६ | १६८१९ | ६७२७४ | १००० | ६ महिने |
| १४ | काटे मारुती मंदिर परिसरात संरक्षक भिंत बांधकाम करणे. | ३८५६०२ | ७७१२ | २०८४८ | ५०० | ३ महिने |

स्वाक्षरीत/-
(ए.एम.सोनवणे)
कनिष्ठ अभियंता
नगर परिषद वैजापूर

स्वाक्षरीत/-
(प्रकाश पाटील)
नगर अभियंता
नगर परिषद वैजापूर

स्वाक्षरीत/-
(बि.यु. बिघोत (राजपुत))
मुख्याधिकारी
नगर परिषद वैजापूर